(155)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गोंदिया  **P.S.**(ठाणे): गंगाझरी  **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0277  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 25/11/2021 18:36 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार  **Date From** (दिनांक पासून): 25/11/2021

**Time Period** (कालावधी): पहर 3  **Date To** ( दिनांक पर्यंत): 25/11/2021

**Time From** (वेळेपासून): 08:34 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 08:55 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 25/11/2021  **Time** (वेळ): 18:36 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 025  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/11/2021 18:36 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 0.5 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): गोंदिया तिरोडा रोड,बस स्टॉप चौक, गंगाझरी ,गोंदिया

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजु कारू चिचखेडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव):

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1969  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | गंगाझरी,गोंदिया,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | गंगाझरी,गोंदिया,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9764927026**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय प्रेमलाल सव्वालाखे | | | 1. मांडेसर,मोहाडी ,गंगाझरी,गोंदिया, महाराष्ट्र,भारत<br>2. साईमंदीर रोड,विद्यानगर,टि बी टोली गोंदिया,गोंदिया,राम नगर,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | तिन मेमोरी कार्ड सॅनडीस्क कंपनिचे | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या 16 चलनी नोटा | 8,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | एक फिक्कट पिवळ्या रंगाची जुनी वापरती कापडी पिशवी | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 8,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादं ला.प्र.वि.गोंदिया कम्प-पो.स्टे.गंगाझरी दि. 25.11.2021नांवः- श्री.राजु कारू चिचखेडे, वय 52 वर्ष, व्यवसाय-शेती, रा.सेंटर पाईट चौक, ग्रामपंचायत रोड, गंगाझरी, ता.जि. गोंदिया. मो.क्र. 9764927026 मी दि. 23.11.2021 रोजी पोलीस उपअधिक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर, ला.प्र.वि. गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर मराठीत टंकलिखीत करुन त्याची प्रिंट आऊट काढुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे माझा मित्र श्री. किशोर गजानन मेश्राम यांचेसह येवून तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहतो व शेतीचे काम करतो. महाराष्ट्र शासनाच्या मराठवाडा पकेज योजना अंतर्गत 202 शेळी गट वाटप योजने अंतर्गत मला लाभ मिळण्याकरीता मी पंचायत समिती गोंदिया येथे अर्ज केला होता. त्यानुसार मला 202 शेळी गट मंजुर झाले. त्यावरून मी दि. 23.12.2020 रोजी सदर योजने अंतर्गत 202 (शेळीबोकड) कृषी उत्पन्न बाजार समिती, गोरेगाव, जि. गोंदिया येथुन श्री. किशोर गजानन मेश्राम यांचेकडुन रू. 1,34,000/- खरेदी केले. त्यानंतर पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती गोंदिया येथुन 202 शेळी गट वाटप योजने अंतर्गत मला लाभार्थी अनुदान रक्कम रू. 57,350/- चा पहिल्या टप्प्यातील लाभ माझे इंडीयन ओवरसीज बंक, शाखा गोंदिया येथील खाते क्र. 223601000001282 मध्ये जमा झाले. तसेच दुस-या टप्प्यात लाभार्थी अनुदान रक्कम रु. 57,350/- चा लाभ सहा महीन्यानंतर मिळणे बाकी होते. दि. 17.11.2021 रोजी श्री. सव्वालाखे, लिपीक, पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, गोंदिया यांना भेटुन मराठवाडा पकेज योजना अंतर्गत 202 शेळी गट मधील दुस-या टप्प्यातील लाभार्थी अनुदान रक्कम रू. 57,350/- लाभ कधीपर्यंत प्राप्त होईल, याबाबत मी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी मला म्हटले की, तुमचे उर्वरीत दुस-या टप्प्यातील लाभ तुम्हाला मिळवुन देतो, परंतु त्याकरीता तुम्ही मला रू. 10,000/- दया, असे बोलुन माझ्याकडे रु. 10,000/- लाच रकमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे व्यवस्था करून देतो, असे बोलुन निघुन आलो. त्यानंतर दि. 18.11.2021 रोजी माझा मित्र श्री. किशोर मेश्राम, रा. गंगाझरी यांनी मला सांगितले की,

श्री. सव्वालाखे यांनी त्यांच्या मोबाईलवर फोन करून सांगितले की, मी राजुला फोन करत आहे, परंतु राजुशी बोलणी झाली नाही, मी राजुचे मराठवाडा पॅकेज योजना अंतर्गतचे दुस-या टप्पातील लाभार्थी अनुदान रकमेचे काम करून देतो, त्याकरीता त्याला रू. 10,000/-मला दयावे लागतील, तुम्ही त्यांना रू.10,000/- घेवुन पंचायत समिती, गोंदिया येथे पाठवुन दया, असे सांगितल्याचे मला सांगितले. गै.अ. श्री. सव्वालाखे, लिपीक, पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, गोंदिया यांनी माझे मराठवाडा पकेज योजना अंतर्गत 202 शेळी गट मधील दुस-या टप्प्यातील लाभार्थी अनुदान रक्कम रू. 57,350/- काढून देण्याकरीता माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 10,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे मी त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझे त्यांचेषी कोणतेही पुर्व वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. मला चांगल्याप्रकारे लिहता वाचता येत नाही, परंतु मला माझ्या नावाची सही करता येते. माझी तक्रार मला वाचुन दाखविली. माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखीत केलेली असुन बरोबर आहे.तद्नंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून पंच श्री. अरूण मारोती मांढरे, कनिष्ठ लिपीक, सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय (तांत्रीक) गोंदिया व श्री. सुरेश लक्ष्मण शहारे, कनिष्ठ लिपीक, तालुका कृषी अधिकारी, गोंदिया यांची ओळख आमच्याषी करुन दिली व त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली. पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी श्री. अरूण मारोती मांढरे यांना पंच क्र. 1 तर श्री. सुरेश लक्ष्मण शहारे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमले. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी स्वाक्षरी केली. पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी प्रथम व्हाईस रेकर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी आम्हास व पंचास सापळा पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 12.48 वाजता व्हाईस रेकर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 श्री. मांढरे यांच्या आवाजात पडताळणीकरीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकर्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी दुचाकी वाहन बजाज डिस्कव्हर क्र. एम.एच. 35 डब्ल्यु 9674 ने गै.अ. श्री सव्वालाखे, पशुधन पर्यवेक्षक, पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती गोंदिया यांचेशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता पंचायत समिती, गोंदिया कार्यालयात जाण्यास रवाना केले.मी पंच क्र. 1 यांचेसह पंचायत समिती कार्यालय, गोंदिया येथे गेलो. त्याठिकाणी गै.अ. श्री सव्वालाखे हे हजर मिळाले. गै.अ. श्री सव्वालाखे हे मुतारीकडे जात असल्याचे दिसले. त्यावरून मी त्यांचे मागोमाग मुतारीकडे गेलो. त्याठिकाणी त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी माझे मराठवाडा पकेज योजना अंतर्गत शेळी गट मधील दुस-या टप्पातील लाभार्थी अनुदान रक्कम देण्याकरीता तोंडी दहा असे बोलुन व नंतर भितींवर 10,000/- असे लिहुन दाखवुन माझ्याकडे रु. 10,000/- लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून तडजोडीअंती रू. 8,000/- लाच रकमेची मागणी करून लाच रक्कम दि. 24.11.2021 रोजी स्वीकारण्याची तयारी दर्षवुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. यानंतर वेळ 13.59 ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात पंच क्र. 1 सह परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आले.त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकर्डर मधील रेकर्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. श्री सव्वालाखे यांनी माझे मराठवाडा पकेज योजना अंतर्गत शेळी गट वाटप योजनेचे दुस-या टप्पातील लाभार्थी अनुदान रक्कम देण्याकरीता माझ्याकडे रु. 10,000/- लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून तडजोडीअंती रू. 8,000/- लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यानंतर पोउपअधि श्री अहेरकर यांनी गै.अ. यांच्याविरूध्दची पुढील सापळा कार्यवाही दि. 24.11.2021 रोजी करण्याचे ठरवुन मला दि. 24.11.2021 रोजी सकाळी 10.00 वा. ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात हजर राहण्याची सुचना दिली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोउपअधि श्री अहेरकर यांनी पंचनामा क्र. 1 मध्ये घेतल्या आहेत.पोउपअधि श्री अहेरकर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. 24.11.2021 रोजी सकाळी 10.00 वा ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात हजर आलो. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 8,000/-त्यांच्याकडे जमा केली. पोउपअधि श्री अहेरकर यांच्या सुचनेवरुन पंच क्र. 1 यांच्या हस्ते माझी अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी लाच रकमेला लावण्यात येणा-या अँथ्रासीन पावडरची वैशिष्ट सांगुन त्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखविले. त्यानंतर रू. 500/- दराच्या 16 चलनी नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिष्यात ठेवुन दिला. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी आम्हास व पंचास सापळा पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 12.07 वाजता व्हाईस रेकर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 श्री. मांढरे यांच्या आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे सभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकर्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी दुचाकी वाहन बजाज डिस्कव्हर क्र. एम.एच. 35 डब्ल्यु 9674 ने गै.अ. श्री सव्वालाखे यांना लाच रक्कम देण्याकरीता पंचायत समिती, गोंदिया कार्यालयात जाण्यास रवाना केले. पो.उपअधि. श्री अहेरकर हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह आमचे मागो-माग येवुन पंचायत समिती, गोंदिया कार्यालयाच्या आत आजुबाजुला दबा धरून बसले.मी पंच क्र. 1 यांचेसह पंचायत समिती कार्यालय, गोंदिया येथे गेलो. त्याठिकाणी गै.अ. श्री सव्वालाखे हे हजर मिळाले. त्यावेळी त्यांचे कार्यालयात माझी त्यांचेषी माझ्या कामासंबंधी बोलणी झाली. त्यावेळी त्यांनी उदया सकाळी तुमच्या गावी येतो, असे सांगुन लाच रक्कम स्विकारली नाही. यानंतर वेळ 12.51 ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात पच क्र. 1 सह परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आले.त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकर्डर मधील रेकर्ड झालेले संभाषण ऐकुण गै. अ. श्री सव्वालाखे यांनी माझ्या कामा संबंधाने बोलणी झाल्याचे व गै. अ श्री. सव्वालाखे हे माझ्या गावी सकाळी येण्याचे सांगीतल्याची खात्री केली. त्यानंतर पोउपअधि. श्री. अहेरकर यांनी आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या खिश्यातुन लाच रक्कम रू. 8,000/- अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा काढुन त्या नोटा एका कागदी लिफाफ्यात टाकुन सिलबंद करुन लिफाफा कार्यालयील कपाटात सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर पोउपअधि श्री अहेरकर यांनी गै.अ. यांच्याविरूध्दची पुढील सापळा कार्यवाही दि. 25.11.2021 रोजी गंगाझरी येथे करण्याचे ठरवुन मला दि. 25.11.2021 रोजी सकाळी 08.00 वा. गंगाझरी येथील मरघट नाल्याजवळ हजर राहण्याची सुचना दिली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोउपअधि श्री अहेरकर यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतल्या आहेत.पोउपअधि श्री अहेरकर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी आज दि. 25.11.2021 रोजीचे वेळ 08.00 वा. गंगाझरी येथील मरघट नाल्याजवळ पोहचलो. त्याठिकाणी पोउपअधि श्री अहेरकर हे दोन्ही पंच व सापळा पथकासह हजर आले. पोउपअधि श्री अहेरकर यांच्या सुचनेवरुन पंच क्र. 1 यांच्या हस्ते माझी अंगझडती घेण्यात आली. त्यांनतर पोउवअधि श्री अहेरकर यांनी अधिनिस्त कर्मचा-यांचे हस्ते रु. 8.000/- अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा ठेवुन असलेला लाच रक्कमेचा सिलबंद लिफाफा फोडुन लाच रक्कम रु. 8,000/- पंचासमक्ष माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या रिकाम्या खिष्यात ठेवली.त्यानंतर पो.उपअधि. श्री अहेरकर यांनी आम्हास व पंचास सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. दरम्यान गै.अ. श्री सव्वालाखे यांनी माझ्या मोबाईलवर फोन करुन बोलणी केली असता मी त्यांना बस स्टप चौक, गंगाझरी येथे येतो असे सागीतले. त्यावरुन पोउपअधि श्री अहेरकर यांनी गै.अ. श्री सव्वालाखे याच्याविरुध्द सापळा कार्यवाही बस स्टप चौक, गंगाझरी येथे करण्याचे ठरविले. त्यानंतर वेळ 08.34 वा. व्हाईस रेकर्डर सुरु करून पंच क्र. 1 यांच्या आवाजात सापळा कार्यवाहीकरीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व व्हाईस रेकर्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी दुचाकी वाहन बजाज डिस्कव्हर क्र. एम.एच. 35 डब्ल्यु



पोलीस स्टेशन, गंगाझरी जि. गोंदिया

9674 ने मै.अ. श्री सव्वालाखे यांना लाच रक्कम देण्याकरीता बस स्टप चौक, गंगाझरी येथे जाण्यास रवाना केले. पो.उपअधि. श्री अहेरकर हे पंच क्र. 2 व सापळा पथकातील सदस्यांसह आमचे मागो-माग येवुन गंगाझरी बस स्टप चौकच्या आजुबाजुला दबा धरून बसले. मी पंच क्र. 1 यांचेसह बस स्टॉप चौक, गंगाझरी येथे गेलो. त्याठिकाणी मै.अ. श्री सव्वालाखे हे दुचाकी वाहनासह हजर होते. मी त्यांचे जवळ पंच क्र. 1 सह गेलो. त्याठिकाणी त्यांच्याशी बोलणी दरम्यान त्यांनी मला व पंच क्र. 1 यांना आपल्या दुचाकी वाहनावर बसवुन रेल्वे स्टेशन रोडकडे घेवुन गेले व काही अंतरावर गेल्यानंतर आपले वाहन थांबविले.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): POPAT BABAN TILEKAR(I (Inspector)) / 15101000402PBTM8801F **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए..सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): POPAT BABAN TILEKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402PBTM8801F

पो.ना. ९७०६ महेन्द्र कटरे
स्टे. डा. अंमलदार
पो.ठाणे, गंगाझरी

प्रथम खबरेची एक प्रत मिळाली

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)